# <u>नियमित दिवाणी दावा क्र. १२६/२०१३</u>

श्री आनंदराव जगरु जमाले व इतर विाा श्री. गणेश विष्णु तवर व इतर

CNR No.- MHST070008462013.

## <u>निशाणी क्र. १५६ वरील आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज वादींच्या वतीने नि.दि.दावा क्र.४९८/१९९८ मधील वादपत्राची प्रमाणित प्रत, ग्रामपंचायत वारुंजी यांचेकडील दि.०१/१२/२०१२, २३/०१/२०१३ व २४/०१/२०१३ रोजीच्या ठरावाच्या प्रती, हे कागदपत्र दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. प्रतिवादींच्या वतीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करून आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादींच्या वतीने कथन आहे की, विवादित कागदपत्रे दावा दाखल करतेवेळी वादपत्रासोबत दाखल करणे आवश्यक होते. वादीचा उलटतपास पुर्ण झाला असून विलंबाने अर्ज दाखल केला असल्याने नामंजूर करण्याबाबत विनंती केली आहे.

३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षांतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | **होय.** |
| २) | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो.** |

### <u>:: कारणमिमांसा ::</u>

**<u>वादप्रश्न क्र.१ करीता</u> :–**

५. अभिलेखाचा विचार करता, प्रस्तुत दावा साठेखतानुसार खरेदीदस्त होवून मिळणेबाबत तसेच, निरंतर मनाई हुकूम मिळणेबाबत आहे. दावा मिळकत स्थावर मालमत्ता आहे.

नियोजीत कागदपत्र दावा मिळकती संदर्भातील वस्तुस्थिती स्पष्ट करणारे आहेत. त्यामुळे सदर कागदपत्र प्रकरणाशी संबंधीत आहे. वादाचे स्वरूप पाहता, उभय पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत होणे आवश्यक आहे. त्याकरीता, उभय पक्षकारांनी दाखल केलेली कागदपत्रे अभिलेखावर असणे जरूरीचे आहे. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे काही एक नुकसान होणार नाही. तथापि, उभय पक्षकारास पुरावा देण्याची संधी प्राप्त होऊन वादाचे निवारण होणार आहे. या उलट, अर्ज नामंजूर झाल्यास वादींस नैसर्गीक न्याय तत्व नाकारले जाऊन प्रकरणांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी या मतास आहे की, अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, वादप्रश्न क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवीला आहे.

**वादप्रश्न क्र.२ करीता :–**

६. उपरोक्त उहापोह विचारात घेता अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. त्यामुळे वादाचे स्वरूप विचारात घेता, मी या मतास आहे की, दाव्याच्या प्राथमिक स्थितीत कोणा एका पक्षकारावर खर्च बसवणे योग्य व न्यायाचे नाही. सबब, न्यायदृष्टीने, मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे;

## आदेश

१) वादींचा अर्ज निशाणी क्र. १५६ मंजूर करण्यात येतो.

२) या अर्जाचा खर्च अंतीम निर्णय ज्याच्या पक्षात होईल त्यास देणेत यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2025.12.12 17:02:31 +0530

(अ.अ. उत्पात)

दिनांक :– १२/१२/२०२५.

५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कराड, जि. सातारा.